## पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन

# कामधेनु दत्तक ग्राम योजनेशी निगडीत विस्तार कार्यक्रम व मार्गदर्शक सूचना














# कामधेनु दत्तक ग्राम योजनेशी निगडीत विस्तार कार्यक्रम

- **प्रस्तावना**

महाराष्ट्रामध्ये शेतीला उत्तम जोडव्यवसाय म्हणून पशुपालानाकडे पाहीले जाते. कितीही अडचणी आल्या तरी शेतकरी पशुधन वाऱ्यावर सोडत नाही याचे प्रत्यंतर अनेकदा आले आहे असे असताना अलीकडच्या काळात जनावरांच्या वाढत्या किमती, चाऱ्याची टंचाई, पोषणावरील वाढता खर्च यामुळे पशुपालन कठीण होत चालले आहे. त्यामुळेच पशुवैद्यकीय सेवेच्या विस्ताराबरोबरच शासनाने पशुपालनासंदर्भातील अन्य समस्या लक्षात घेऊन त्या सोडविण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. या सर्व समस्या परस्परांशी निगडीत असल्याने पशुवैद्यकीय शास्त्राला अत्यंत महत्व प्राप्त झाले आहे. चांगल्या दुग्धोत्पादनासाठी जनावरांचे आरोग्य चांगले राहणे आवश्यक आहे. कारण जनावर आजारी पडल्यास त्याचा परिणाम थेट दुग्धोत्पादनावर होतो परिणामी पशुपालकांचे अर्थशास्त्र कोलमडते. अशी वेळ येऊ नये यासाठी जनावरांचे आरोग्य उत्तम रहायला हवे. त्यासाठी पशुपालकांना जनावरांचे लसीकरण, जंतूनिर्मुलन, रक्तजल व रोगनमुने तपासणी, जनावरामधील वंधत्वाचे व्यवस्थापन, गोचीडांचे निर्मुलन, दुग्धस्पर्धांचे आयोजन, निकृष्ठ चारा सकस करण्यासाठी प्रात्यक्षिके व सांसर्गिक रोगांची माहिती इत्यादी विषयांचे ज्ञान असणे आवश्यक आहे व सदर ज्ञानाचा प्रत्यक्ष वापर होणे देखील आवश्यक आहे.

तथापि पशुवैद्यकीय संस्थेमार्फत वरील सर्व कार्यक्रम वेगवेगळ्या गावांमध्ये राबविले जाण्याची शक्यता असते. वास्तविक पाहता तांत्रिक दृष्टीकोनातून सदर कार्यक्रम एकाच गावामध्ये विशिष्ठ क्रमाने राबविल्यास त्याचा निश्चितपणे चांगला परिणाम होतो. उदा. एकाच गावातील सर्व जनावरांना जंत निर्मुलन, गोचीड गोमाश्या निर्मुलन, लसीकरण इत्यादी लाभ दिल्यास जनावरांची उत्पादन क्षमता निश्चित वाढते. त्याच प्रमाणे अशा निवडक गावांमध्ये शासनाच्या इतर योजनांचा लाभ देखील शेतकऱ्यांना करून दिल्यास त्याचा पशुसंवर्धन विषयक सर्वांगीण विकास होणे सहज शक्य आहे असे दिसून येते. पशुसंवर्धन विभागाच्या सर्व योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हावी व सर्व योजनांचा लाभ प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहचावा या दृष्टीकोनातून कामधेनु दत्तक ग्राम योजनेची सुरुवात करण्यात आली आहे.

कामधेनु दत्तक ग्राम योजना राबविताना जास्तीत जास्त लोकांचा सहभाग राहील असे पहावे. त्याच प्रमाणे दत्तक गावांमध्ये इतर योजना उदा. अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत दुधाळ जनावरांच्या गटाचा पुरवठा करणे, दुधाळ जनावरांना खाद्य पुरवठा करणे व पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षण देणे इत्यादी व राज्य योजना अंतर्गत नाविन्यपूर्ण योजना राबविणे व सर्वसामान्यासाठी दुधाळ जनावरांचे गटवाटप करणे इत्यादी योजना देखील राबविण्याचा प्रयत्न करावा जेणेकरून सर्व योजनांचा एकत्रीत लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेल व त्यांचा पशुसंवर्धन विषयक सर्वांगीण विकास झाल्याचे दिसून येईल.

- **कामधेनु दत्तक ग्रामाची निवड शासन निर्णय क्रमांक नापुयो - २०१०/ प्र.क्र. ५०/पदुम - ४. मुंबई दिनांक २९/१०/२०१० मधील नमूद निकषानुसार करण्यात यावी.**

- **योजनेचे कार्यक्षेत्र व योजना राबविण्याचा कालावधी :**

सन २०११ - २०१२ मध्ये सदर योजना राज्यातील १५६६ श्रेणी - १ पशुवैद्दकीय दवाखाने, २९०२ श्रेणी - २ पशुवैद्दकीय दवाखाने, २९ जिल्हा पशु सर्वचिकीत्सालये व १७१ तालुका लघु पशु सर्वचिकीत्सालयांच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येकी एका गांवामध्ये पहिल्या टप्प्यात राबविण्यात येईल. अशा प्रकारे

सदर योजना पहिल्या टप्प्यामध्ये एकूण ४६६८ गांवामध्ये राबविण्याचे प्रस्तावित आहे. तदनंतर पाच वर्षांच्या कालावधी मध्ये उर्वरित सर्व गांवामध्ये टप्प्या टप्प्याने योजनेची व्याप्ती वाढविण्याचे प्रस्तावित आहे.

- **योजनेचे स्वरूप :**
  - निवडलेल्या दत्तक गांवामध्ये दुधात असलेल्या व भाकड संकरीत गायी/ देशी गायी/ म्हशी, शेळ्या मेंढया पारड्या, वासरे यांची शेतकरी निहाय गणना करावी.
  - गणनेच्या वेळी दुधात असलेल्या गायींचे/ म्हशींचे दुध उत्पादनाची नोंद श्रेणी - १ व श्रेणी - २ संस्थेद्वारे घेण्यात यावी.
  - सदर गायी म्हशींच्या वंध्यत्वाबाबतची सुद्धा प्राथमिक माहिती घेण्यात यावी.
  - दत्तक गावांची निवड करतेवेळी सदर गावांची पूर्ण माहिती होणे आवश्यक आहे.उदा.गावामध्ये पूर्वीच्या पाच वर्षांमध्ये आढळलेले संसर्गजन्य आजार कोणते ?गावामध्ये या पूर्वी सांसर्गिक गर्भपात अथवा बृसेलोसीस इत्यादी सारख्या रोगांचा प्रादुर्भाव झाला आहे काय? विषबाधेच्या उदा.Oxalic Acid poisoning, Nitrate poisoning इत्यादी प्रकारच्या विषबाधेचा प्रादुर्भाव दिसून आला काय ? या बाबतचे सर्वेक्षण करणे अत्यावश्यक आहे.
  - निवड झालेल्या गांवामध्ये विशेष ग्राम सभांचे व योजनेच्या विविध टप्प्यावर आयोजन करून स्थानिक पशुपालक/ शेतकऱ्यांना योजने बाबत व सहभागा बाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.
  - दूधसंकलन केंद्र/ प्राथमिक सहकारी दुग्धसंस्था यांच्या सुद्धा सक्रीय सहभागाबाबत नियोजन करावे.
  - योजना राबविताना जंतनाशक औषधे पाजणे, गोचीड/ गोमाश्या निर्मुलन कार्यक्रम, निकृष्ट चारा सकस करण्याचे प्रात्यक्षिकांचे आयोजन करून त्यामध्ये उद्धभवणाऱ्या वैरणीची टंचाई दूर करण्यासाठी पशुपालकांचे "चारा वाचवा पशुधन जगवा" या संदेशाद्वारे प्रबोधन करावे.
  - दुग्धस्पर्धांचे आयोजन करून त्यामध्ये पशुपालकांची जनावर निहाय नोंद घेण्यात यावी .
  - लसीकरणाची शिबिरे घेऊन सांसर्गिक रोगांबाबत शेतकऱ्यांचे प्रबोधन करावे .
  - वंध्यत्व निवारण शिबिरांचे आयोजन करून शिबिरांमध्ये आलेल्या प्रत्येक जनावरांचे रक्त जल नमुने, शेण नमुने, गर्भाशयातील स्त्राव इत्यादी प्रयोगशाळा तपासणीसाठी घेण्यात यावे व नमुना तपासणीत लोह, प्रोटीन्स, कॅल्शियम फॉस्फरस, हिमोग्लोबीन इत्यादि मूलद्रव्यांचे कमतरतेबाबत निदान करून त्या जनावरांवर समर्पक औषधोपचार करण्यात यावा.
  - योजना राबविताना सुरुवातीला काही गाई/ म्हशी दुधात असतील तर काही गाभण. त्यामुळे योजनेचा पूर्ण लाभ मिळावा या साठी योजना शक्यतो संपूर्ण वर्षभर राबवावी व योजनेचे मूल्यमापन सहा महिन्यांनी दोन टप्प्यामध्ये करावे. जेणेकरून वर्षभरात वेगवेगळया कालावधीमध्ये दुधात असणाऱ्या गाई-म्हशींच्या दुध उत्पादनामध्ये किती वाढ झाली याबाबत माहिती घेता येईल व योजनेचे एकंदरीत मूल्यमापन करणे शक्य होईल.

- कामधेनु दत्तक ग्राम योजनेसाठी निवड केलेल्या एका दत्तक गावाकरिता रुपये १,५२,५००/- च्या (रुपये एक लाख बावन्न हजार पाचशे मात्र) मर्यादेत शासन शुद्धिपत्रक दिनांक १६ डिसेंबर २०११ मधील नमूद बाबींवर मार्गदर्शक सूचनांच्या अधीन राहून खर्च करण्यात यावा.

## कामधेनु दत्तक ग्राम योजनेच्या अंमलबजावणी करिता वार्षिक संदर्भ आराखडा :

### १. अद्ययावत पशुगणना :

निवडलेल्या दत्तक गावामध्ये दुधात असलेल्या व भाकड संकरित गाई /म्हशींची /देशी - गावठी गाई - म्हशींची अद्यावत गणना करण्यात यावी. ही गणना करताना शेतकरी /पशुपालक निहाय गणना करून दुग्धोत्पादनातील सर्व गायी-म्हशींच्या दुग्धोत्पादनाची प्रत्येक दुधाळ जनावरनिहाय विहित नमुन्यामध्ये व्यवस्थित नोंद करावी .हे सर्वेक्षण संबंधित गावातील /नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यावरील पशुसंवर्धन कर्मचाऱ्यांने /पविअ यांनी करावे . तसेच सदर गावातील गायी-म्हशींच्या लैंगिक आरोग्य स्थितीबाबतही सदर सर्वेक्षणामध्ये प्राथमिक अंदाज घेण्यात यावा.

दत्तक गांवामधील सर्व प्रकारच्या जनावरांच्या शेतकरी निहाय (गाई/ म्हशी/ वासरे/ बैल/ रेडे/ शेळ्या/ मेंढ्यांची) गणना करावी. दुभत्या गाई व म्हशींची गणना करताना त्या किती महिन्यापासून दुधात आहेत व त्यांचे दुध उत्पादन किती आहे या बाबतच्या सविस्तर नोंदी घ्याव्यात. तसेच गाई - म्हशींच्या वंध्यत्वाबाबत अडचणी असल्यास त्याबाबतची प्राथमिक माहिती देखील नोंदवहीमध्ये नोंदविण्यात यावी.

### २. पशुपालक मंडळस्थापन करणे व सहलीचे आयोजन करणे :

दत्तक ग्राम योजनेंतर्गत निवड केलेल्या गावामध्ये ज्या पशुपालकांकडे जास्त पशुधन घटक संख्या आहे अशा ५१ सभासदांची निवड करावी .अशा निवडलेल्या सभासदांची बैठक घेऊन त्यापैकी ज्या सभासदांकडे जास्त पशुधन घटक संख्या आहे अशा ११ सभासदांचे पदाधिकारी मंडळ स्थापन करावे. अशा स्थापन केलेल्या मंडळास स्थानिक नाव देऊन त्याची नोंदणी धर्मादाय आयुक्त यांचेकडे करावी . मात्र गावामध्ये विविध कार्यक्रम राबविण्याकरिता मंडळाची नोंदणी होण्याची वाट पाहू नये. गावामध्ये ग्रामसभा घेतेवेळी पशुपालक मंडळातील पशुपालकांचा सहभाग असणे आवश्यक आहे. पशुपालकांसाठी सहलीचे आयोजन करताना पशुपालक मंडळातील पशुपालकांना प्राधान्य द्यावे.सहलीचे ठिकाण निश्चित करताना दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन इत्यादी पशुसंवर्धन विभागाशी संबंधित असलेल्या सर्वोत्कृष्ट अशा संस्था/ व्यवसाय असलेल्या ठिकाणांना प्राधान्य द्यावे.

### ३. ग्रामसभेचे आयोजन :

निवडलेल्या गावामध्ये विशेष सभा/ ग्रामसभेचे आयोजन करून स्थानिक पशुपालक/ शेतकऱ्यांना योजनेबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी .याच सभेच्या वेळी पशुपालकांना योजनेमध्ये जी शिबिरे/ कार्यमोहीमा आयोजित करण्यात येणार आहेत त्याबाबतचे वेळापत्रक सांगण्यात यावे. व सदर वेळापत्रक ग्राम पंचायतीच्या सूचना फलकावर लावावे.जेणेकरून ते सहजपणे सर्व ग्रामस्थांच्या नजरेस येईल व कार्यमोहीमा/ शिबिराचे वेळापत्रक त्यांचे स्मरणात राहील.यास्तव आवश्यकता भासल्यास होर्डिंग/ बॅनर देखील सदर गावात योग्य ठिकाणी लावण्यात यावेत. याच सभेच्या वेळी स्थानिक पशुपालक,दुध संकलन केंद्र,सहकारी दुध संस्था यांचा नेमका कशाप्रकारे सहभाग या योजनेमध्ये मिळणे आवश्यक आहे,त्याबाबत स्पष्ट कल्पना त्यांना देवून

सहकार्य करण्याबाबत व सहभागी होण्यासाठी आवाहन करावे. त्याचप्रमाणे सदर गावामध्ये शासनाच्या बिगर आदिवासी सर्वसाधारण योजनेंतर्गत पशुसंवर्धनासाठी प्रदर्शन व प्रचार कार्यक्रमाचे आयोजन करावे. याद्वारे शेतकऱ्यांना पशुसंवर्धनाविषयी संवार्गीण माहिती मिळावी व त्यायोगे त्यांना पशुसंवर्धनाबाबत आवड निर्माण होऊन शाश्वत उत्पन्नाचे साधन म्हणून पशुपालनाकडे बघण्याची दृष्टी प्राप्त करून देणे व शास्त्रोक्त पशुपालनाचा प्रसार करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

दत्तक गावाची निवड झाल्यानंतर गावामध्ये विविध ग्रामसभा तसेच वंध्यत्व निवारण शिबीर, गोचीड गोमाश्या निर्मुलन शिबीर जंतनाशन शिबीर अशा विविध कार्याक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याने त्यासाठी आवश्यक असणारी स्टेशनरी, पोस्टर्स, माहित पत्रिका, साऊंड सिस्टीम तसेच कार्यक्रमांना प्रसिद्धी देण्या करिता केबल, रेडिओ, दूरदर्शन, वर्तमान पत्र इ. मध्ये जाहिराती देणे या सारख्या बाबींवर उपलब्ध तरतुदीतून खर्च करता येईल.

सदर ग्रामसभेमध्ये **शासनाच्या बिगर आदिवासी सर्वसाधारण योजनेंतर्गत वैरण व पशुखाद्य विकास कार्यक्रमाबाबत सर्व शेतकऱ्याना सविस्तर माहिती द्यावी.** सदर योजना सर्व प्रवर्गातील शेतकरी व पशुपालकांना लागू असून या योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या शेतावर वैरण उत्पादनासाठी वैरण बियाणे वाटप करण्यात येते त्यानुसार १०० टक्के अनुदानावर रुपये ६००/- च्या मर्यादेत ज्वारी, मका, बाजरी, बर्सीम, लुसर्ण इ. वैरण बियाणे तसेच नेपिअर, यशवंत व जयवंत या सुधारित बहुवर्षीय गवत प्रजांतीचे ठोंबे वाटप करण्यात येतात. विशेषतः यशवंत गवतापासून प्रति हेक्टरी २०० ते २५० टन हिरव्या चाऱ्याचे उत्पादन मिळते व यामध्ये १०.५७ टक्के प्रथिनांचे प्रमाण असते. तसेच जयवंत गवतापासून प्रति हेक्टरी २५० ते ३०० टन हिरव्या चाऱ्याचे उत्पादन मिळतेतून व त्यामध्ये १०.३५ टक्के प्रथिनांचे प्रमाण असते. यामुळे सदर गवताची लागवड करण्याकडे शेतकऱ्यांचा कल दिसून येतो. त्याकरिता शेतकऱ्यांना प्रोस्ताहीत करावे.

विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रमांतर्गत संकरीत/ देशी गोवंशाच्या कालवडी, सुधारित/ देशी म्हशींच्या पारड्यांच्या जोपासना करण्यासाठी अर्थसहाय्य करण्यात येते. सदर कार्यक्रमांतर्गत पशुखाद्याच्या स्वरुपात अल्पभूधारक/ अत्यल्प भूधारकास व भूमिहीन शेतमजुरास ५० टक्के अनुदानावर पशुखाद्य देणे व पशुपालकांचे संकरीत/ देशी कालवडी/ सुधारित देशी पारड्यांचा विमा या बाबींचा अंतर्भाव करण्यात येतो. सदर योजनेचा लाभ देखील दत्तक गावामधील शेतकऱ्यांना देण्याचा प्रयत्न करावा.

सदर ग्रामसभेमध्ये आगामी कार्यक्रमांचे वेळापत्रक देतांना पूर्वीच्या माहितीच्या आधारे कोणकोणते संभाव्य आजार जनावरांना होऊ शकतील याबाबतची माहिती द्यावी. मुख्यत्वेकरून घाट अथवा डोंगराळ भागातील चरायला जाणाऱ्या जनावरांमध्ये Oxalic Acid Poisoning, Nitrate Poisoning, तसेच Botulism सदृश आजार दिसून येतात त्याबाबतची माहिती शेतकऱ्यांना दयावी. विशेषतः डोंगराळ भागामध्ये पावसाळ्यामध्ये व त्यानंतरच्या काळात जनावरांमध्ये विविध कारणामुळे मरतुक झाल्याचे आढळून येते त्याबाबत शेतकऱ्यांना खबरदारी घेण्याबाबत आवाहन करावे.

# कामधेनु दत्तक ग्राम योजना २०१२ - २०१३
## योजनेच्या अंमलबजावणीचीचा आराखडा

| अ.क्र. | कार्यवाहीचा तपशिल | महिना | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एप्रिल | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर | ऑक्टोंबर | नोव्हेंबर | डिसेंबर | जानेवारी | फेब्रुवारी | मार्च |
| ०१. | अद्यावत पशुगणना | २ रा आठवडा | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ०२. | पशुपालक मंडळ स्थापन करणे | ३ रा आठवडा | | | | | | | | | | | |
| ०२. | प्रबोधन शिबीर (ग्रामसभा) | १ ला आठवडा | - | - | - | - | - | २ ऑक्टोंबर (विशेष ग्रामसभा क्र -२) | - | - | २६ जानेवारी (विशेष ग्रामसभा क्र.-३) | - | - |
| ०३. | जंतनाशक औषधे पाजणे | - | १ ला आठवडा | - | - | - | १ ला आठवडा (प्रथम बुस्टर डोझ) | - | - | ३ राआठवडा (दुबार बुस्टर डोझ) | - | - | - |
| ०४. | गोचीड/ गोमाशा निर्मुलन | - | २ रा आठवडा | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ०५. | मान्सूनपूर्व लसीकरण | - | ३ रा आठवडा | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ०६. | वंधत्व निवारण शिबीर | - | ४ था आठवडा | - | - | - | २ रा आठवडा (पाठपुरावा -१) | - | - | - | २ राआठवडा (पाठपुरावा -२ ) | - | - |
| ०७. | निकृष्ठ चारा सकस करणे | सप्टेंबर ते मार्च | | | | | | | | | | | |
| ०८. | दुग्ध स्पर्धा व संकरीत वासरांचा मेळावा | - | - | - | - | - | - | ४ था आठवडा | - | - | दिनांक २० ते २२ (द्वितीय) | - | - |
| ०९. | योजनेचा अंतीम प्रगती अहवाल तयार करणे | - | - | - | - | - | - | - | - | - | - | २ रा आठवडा | |
| १०. | जनावरांचे मलमुत्र इ. चे खात व्यवस्थापन करणे | सप्टेंबर ते मार्च | | | | | | | | | | | |
| ११. | वैरण विकास कार्यक्रम | वर्षभर | | | | | | | | | | | |

**४. जंतनाशक औषध पाजणे/ जंतनिर्मुलनासाठी शिबिराचे आयोजन :**

मे महिन्याच्या पहिल्या आठवडयात जंतनिर्मुलन शिबिराचे आयोजन करावे. प्रत्यक्ष जंतनाशक पाजणी करण्यापूर्वी रॅंडम पध्दतीने जनावरांचे शेणनमुने गोळा करून जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठविण्यात यावे. सदर नमुन्यांचे निष्कर्षानुसार गाई, म्हशी, बैल, रेडे, वासरे, पारड्या यांना योग्य त्या जंतनाशक औषधांची पाजणी करण्यात यावी. शासनाच्या विविध योजनांतर्गत पुरवठा करण्यात येणाऱ्या जंतनाशक औषधांचा वापर प्राधान्याने सदर शिबिरांसाठी करावा. या व्यतिरिक्त आवश्यकतेनुसार इतर जंत नाशके लोकसहभागातून अथवा सहकारी दुधसंस्थेकडून उपलब्ध करून घ्यावेत. जंतनाशक औषधांच्या वापराबाबतच्या संबंधित कंपनीच्या मार्गदर्शक सूचनानुसार सप्टेंबर महिन्यामध्ये पहिल्या आठवड्यात प्रथम बूस्टर डोस पाजणे व डिसेंबर महीन्याच्या तिसऱ्या आठवड्यात दुसरा डोस पाजणे बाबत नियोजन करण्यात यावे. जंतनाशकांची पाजणी करताना शेण नमुन्याचे प्रयोग शालेय निष्कर्षानुसार योग्य त्या जंतनाशकांची खरेदी करून ती आयोजित केलेल्या विवध शिबिरांमध्ये योग्य त्या प्रमाणत पाजण्यात यावीत. जंतनाशक पाजणीचा पुर्ण लाभ मिळावा यासाठी शक्यतो सर्व जनावरांना जंतनाशके दिली जातील याची खात्री करावी .

**५. गोचीड/ गोमाश्यांचे निर्मुलन :**

मे महिन्यामध्ये दुसऱ्या आठवड्यात जंतनाशक औषध पाजणे शिबिरानंतर एक आठवड्याच्या अंतराने गोठ्यामधील तसेच जनावरांच्या अंगावरील गोचीड व गोमाश्या व अन्य बाह्य कीटकांचे निर्मुलनासाठी शिबिराचे आयोजन करावे. या शिबिरामध्ये जनावरांवर तसेच पशुपालकाकडील गोठ्यामध्ये गोचीड/ गोमाश्यांचे निर्मुलनासाठी औषधांची फवारणी करावी. अश्या प्रकारची फवारणी २१ दिवसानंतर आवश्यकते नुसार पन्हा करता येईल.

सदर शिबारामध्ये गावातील सर्व जनावराचे गोठ्यातील व जनावरांच्या अंगावरील गोचीड/ गोमाश्या निर्मुलन होईल असे पहावे. गोचीड/ गोमाश्या निर्मुलनाकरिता आवश्यक असणारी औषधे शासकीय योजनामधून पुरविल्या जाणाऱ्या औषधामधून प्राधान्याने उपलब्ध करुन घ्यावी. अन्यथा लोकसहभागातून किंवा सहकारी दुध संस्थांकडून उपलब्ध करून घ्यावी.

**६. रोगप्रतिबंधक लसीकरण :**

मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात गावातील सर्व जनावरांना आवश्यकतेनुसार घटसर्प व फऱ्या रोगप्रतिबंधक मान्सूनपूर्व लसीकरण करण्यात यावे. त्याच प्रमाणे विभागाच्या विहित वेळापत्रकाप्रमाणे केंद्रशासनाच्या लाळ खुरकुत रोग मुक्त पट्टा निर्माण करणे या योजनेंतर्गत तसेच ॲस्कड अंतर्गत लाळ खुरकुत रोगांचे नियंत्रण अंतर्गत लाळ खुरकुत रोगाचे लसीकरण करावे. तसेच पी. पी. आर. रोगाचे नियंत्रण योजने अंतर्गत पूर्व नियोजित दिनांकाना लसीकरण शिबाराचे आयोजन करून रोगप्रतिबंधक लसीकरणाचा कार्यक्रम घेण्यात यावा. आणि त्याबाबतच्या नोंदी ठेवण्यात याव्यात. या व्यतिरिक्त सदर गांवामध्ये यापूर्वी साथरोग प्रादुर्भाव झाल्या असल्यास त्याप्रमाणे आवश्यकतेनुसार रोगप्रतिबंधक लसीकरण करण्यात यावे. उदा. आंत्रविषार, काळपुळी, मेंढ्यामधील देवी इ.

**७. खनिज द्रव्ये मिश्रण व जीवनसत्व पुरवठा :**

खनिज द्रव्ये मिश्रणे व जीवन सत्वे इ. पुरवठा करताना दुधातील गायी - म्हशी त्याच प्रमाणे गाभण जनावरे, माजावर न येणारी जनावरे इ. प्रकारच्या जनावरांना लाभ देता येईल. यासाठी प्रामुख्याने Calcium व

Phosphorus इ. मुल द्रव्ये असणारी खनिज मिश्रणे तसेच जीवन सत्व अ, ब, क व इ यांचा समावेश असलेल्या विविध उत्पादनाचा वापर करता येईल. जानावारांमधील Calcium व Phosphorus पातळी प्रयोग शाळेमध्ये रक्तजल नमुन्याची तपासणी करून पाहता येईल. अशा तपासणी निष्कर्षाचा उपयोग औषध पुरवठा करतेवेळी करण्यात यावा.

**८. वंध्यत्व निवारण शिबीर :**

मे महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात गोचीड व गोमाश्या निर्मुलन शिबीर घेतल्या नंतर एक आठवड्याने म्हणजे मे महिन्याच्या चौथ्या आठवड्यात पहिले वंध्यत्व निवारण शिबीर घेण्यात यावे. व त्या मध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक गाई म्हशींची तपासणी करून त्या बाबतच्या सर्व आवश्यक त्या नोंदी ठेवण्यात याव्यात. तपासणी आणि प्रत्यक्ष लक्षणांवरून निदान केल्या नंतर आवश्यक तो औषध उपचार करण्यात यावा. त्याच प्रमाणे शिबिरात आलेल्या जनावरांचे रक्तजल नमुने, शेण नमुने, गर्भाशयातील स्त्राव इ. नमुने प्रयोगशाळा तपासणी साठी घेण्यात यावे. अशा नमुन्यावरून जनावारामधील हिमोग्लोबिनची, कॅलल्शिम व फॉस्फरस इत्यादी महत्वाच्या मूलद्रव्यांची कमतरता, गर्भाशयाचा दाह इत्यादी आजारांचे नेमके निदान करण्यात येऊन त्यानुसार Lugols Iodine, प्रती जैविके, महत्वाची मुल द्रव्ये, जीवन सत्व असलेली मिश्रणे व इंजेक्शन अशी औषधे उपलब्ध करून पुढील कालावधीत आवश्यक तो औषधोपचार करण्यात यावा. **माजावर** असणाऱ्या **जनावरांना कृत्रिम रेतन करण्यात यावे.** व त्या बाबतची नोंद घेण्यात यावी.

जनावरांच्या वंध्यत्वाच्या विविध कारणांबाबत शेतकऱ्यांना स्तविस्तर माहिती देण्या करीता **वंध्यत्व पत्रिका** तयार करावी. त्यामध्ये जनावरांच्या जननेंद्रिया बाबतच्या विविध आजारांची माहिती दयावी. तसेच जनावरांच्या आहारातील विविध घटकांच्या कमतरतेमुळे निर्माण होणाऱ्या वंध्यत्वा बाबत सोप्या भाषेत माहिती दयावी.

**९. निकृष्ट चारा सकस करणे :**

जनावरांचे संगोपन उत्तम पध्दतीने होण्याच्या दृष्टीने व दुध उत्पादनात अधिक चांगली वाढ होण्यासाठी जनावरांना सकस व संतुलित आहार देणे गरजेचे आहे. त्यासाठी शेतकऱ्यांकडे उपलब्ध असलेला निकृष्ट चारा सकस करणेसाठी शिबिरात प्रात्यक्षिकांचे आयोजन सप्टेंबर ते मार्च या दरम्यान करावे.

प्रात्यक्षिक देतांना खात्याच्या परिपत्रकानुसार उपलब्ध असलेले उसाचे चिपाड, उसाची मळी, उसाचा हिरवा चारा (कुट्टी करून), युरिया, मीठ व खनिज द्रव्य इ. घटक तसेच गव्हाचा भुसा, उसाचे चिपाड, युरिया, खनिज द्रव्य, जीवनसत्व इ. घटक योग्य त्या प्रमाणामध्ये वापरून प्रात्यक्षिक देण्यात यावे. त्याच प्रमाणे मुरघास तयार करण्याचे प्रात्यक्षिक शेतकऱ्यांना देण्यात यावे.

अशा प्रकारे वैरणीची टंचाई दूर करण्यासाठी चाऱ्याचे नियोजन करून तसेच निकृष्ट चारा सकस करून त्याचा वापर केल्यास दुध उत्पादनात वाढ होईल. व त्यामुळे चाऱ्याची बचत झाल्यामुळे उपलब्ध होणारा अतिरिक्त चारा जास्तीत जास्त जनावरांसाठी वापरता येईल.

**१०. दुग्ध स्पर्धांचे आयोजन :**

प्रथम दुग्ध स्पर्धांचे आयोजन ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात करून जनावरांचे संगोपन उत्तम पद्धतीने कसे करायचे याची माहिती पशुपालकांना व्हावी. तसेच ज्या पशुपालकांनी जनावराचे संगोपन उत्तम पद्धतीने केले आहे त्यांना प्रोत्साहन मिळावे या साठी दुग्धस्पर्धेबरोबर व संकरीत वासरांच्या मेळाव्यांचे

आयोजन करावे. तसेच शेतकऱ्यांना स्वच्छ दुध उत्पादनाबाबत माहिती मिळावी यासाठी ध्वनी चित्रफिती दाखविण्यात याव्यात.

दुधात येणाऱ्या अन्य गाई म्हशींसाठी द्वितीय दुग्ध्स्पर्धा दिनांक २० ते २२ जानेवारीच्या दरम्यान घेण्यात यावी. व दोन्हीही दुग्ध स्पर्धेमधील विजेत्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे/प्रमाणपत्र २६ जानेवारीच्या कार्यक्रमामध्ये देण्यात यावे.

**११. विशेष ग्रामसभा क्रमांक २.**

सदर सभेचे आयोजन २ ऑक्टोबर रोजी करावे. सदर सभेमध्ये दुधाळ जनावरांचे व्यवस्थापन, दुधाळ जनावरांचा आहार शास्त्रोक्त पद्धतीचा गोठा, जनावरांमधील वंध्यत्व व त्यावरील उपाययोजना, मूलद्रव्यांची कमतरता जनावरांमधील विविध आजार व उपाययोजना (Feeding, Breeding, & Management) याबाबत दृकश्राव्य माध्यमातून सर्व पशुपालकांना माहिती देण्यात यावी. तसेच सदर योजनेंतर्गत पशुपालकांनी व स्थानिक कर्मचाऱ्यांनी तो पर्यंत केलेल्या कामाचा आढावा घेण्यात यावा.

शेतकऱ्यांना जनावरांना दयावयाच्या समतोल आहाराबाबत सविस्तर माहिती दयावी. अशी माहिती प्रसिद्ध करताना **आहार पत्रिका** तयार करून तिचे वाटप करावे. योजनेच्या **प्रसिद्धी व प्रचार या सदराखालील** उपलब्ध होणाऱ्या निधीमधून काही उपयुक्त पुस्तके, सीडीस कॅसेटस् इ. अत्यावश्यक सामग्री खरेदी करून पंचायत समिती स्तरावर ग्रंथालय सुविधेद्वारे शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करावे.

**१२. पाठपुरावा वंध्यत्व निवारण शिबीर :**

सदर शिबीर सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यामधे आयोजित करावे. पहिल्या व दुसऱ्या वंधत्व निवारण शिबिरामध्ये ३ महिन्यांचे अंतर असावे. सदर शिबिरामध्ये उपचार कलेल्या जनावरांचा पाठपुरावा करण्यात येऊन जनावरांमध्ये काय सुधारणा झाली आहे याबाबतच्या वस्तूनिष्ठ नोंदी घेण्यात याव्या. तसेच मागील शिबिरामध्ये **कृत्रिम रेतन** केलेल्या गाई म्हशीपैकी किती गाई- म्हशी गाभण राहिल्या याची नोंद घ्यावी.

मागील शिबिरामध्ये उपचाराने सुधारणा न झालेल्या जनावरांची पुन्हा सखोल तपासणी करून निदानानुसार उपचार करण्यात यावे.

**१३. विशेष ग्रामसभा क्रमांक ३**

सदर ग्रामसभेचे आयोजन २६ जानेवारी रोजी करण्यात यावे. सदर सभेच्या वेळी दुग्धस्पर्धेमध्ये क्रमांक मिळविलेले शेतकरी तसेच संकरित वासरांच्या मेळाव्यातील बक्षीसपात्र शेतकऱ्यांना बक्षीस वाटप/प्रमाणपत्र वाटप करण्यात यावे. पशुपालकांना वंध्यत्व असलेल्या जनावरांच्या रोगनिदानाबाबत प्रयोगशालेय निष्कर्षाच्या आधारे परिपूर्ण माहिती करून देणे तसेच जनावरांच्या व्यवस्थापनाबाबत पशुपालकांनी उपस्थित केलेल्या शंकांचे निरासन करणे इ. कार्यक्रम सदर सभेमध्ये घेण्यात यावे.

**१४. वंध्यत्व निवारण शिबीर क्रमांक ३**

सदर शिबिराचे आयोजन जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यामध्ये करण्यात यावे. सदर शिबिरामध्ये शिबीर क्र. २ मध्ये कृत्रिम रेतन केलेल्या गाई-म्हशींपैकी किती गाई-म्हशी गाभण राहिल्या याबाबत निदान करून तशी नोंद घेण्यात यावी.मागील दोन्हीही शिबिरांमध्ये उपचार केलेल्या परंतु सुधारणा न झालेल्या जनावरांना कायमस्वरूपी वंध्यत्व असल्यास तशी स्पष्ट कल्पना पशुपालकास देणे आवश्यक आहे.

तसेच अजूनही तात्पुरते वंध्यत्व असलेल्या जनावरांना योग्य तो औषधोपचार करणे व माजावर आलेल्या जनावरांना कुत्रिम रेतन करणे अशा बाबींचा अंतर्भाव सदर शिबिरामध्ये करण्यात यावा.

**१५. नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे :**

नाविन्यपूर्ण उपक्रम राबवितांना पशुपाल्कांच्या स्थानिक गरजांचा विचार करण्यात यावा. हा उपक्रम राबविण्या करिता पशुपालक मंडळाचा ठराव घेण्यात यावा. व त्या नुसार अमलबजावणी करावी. नाविन्यपूर्ण उपक्रमांची फलनिष्पत्ती हि शेतकारांमध्ये पशुपालन व्यवसायासाठी आवड निर्माण होईल अशा प्रकारची असावी. हा उपक्रम राबवितांना स्थानिक गरजेला प्राध्यान्य असल्यामुळे पशुपालक मंडळाच्या मान्यतेने कोणत्याही प्रकारचा विधायक उपक्रम या मधून घेता येईल.

**१६. जनावरांचे मलमुत्र व वाया गेलेल्या** चाऱ्याचे **खात व्यवस्थापन करणे, प्रशिक्षण व प्रात्यक्षिके :**

शेणखताचे महत्व शेतकऱ्यांना पटून द्यावे. दर्जेदार शेणखत तयार करणेकरिता शेण व मलमुत्र व वाया गेलेला चारा यांचा योग्य वापर करून ते कुजविण्यात येते. त्या साठी जीवाणू संवर्धनाचा वापर करण्यात येतो. तसेच गांडूळ, बायो डायनामिक्स इ. आधुनिक तंत्र्यज्ञानाचा वापर करून उत्तम प्रकारचे शेणखत तयार करण्यात येते. या बाबत पशुपालकांना माहे सप्टेंबर ते माहे मार्च या कालावधीमध्ये प्रशिक्षण देण्यात यावे. त्यासास्ठी आवश्यकते नुसार कृषी विभागाची मदत घ्यावी. सदर उपक्रम राबवितांना काही प्रमाणात निधीची अतिरिक्त आवश्यकता भासल्यास “आत्मा” (**ATMA**) योजने अंतर्गत मागणी करावी व निधी उपलब्ध करून घ्यावा.

**१७. योजनेचा प्रगती अहवाल सादर करणे**

या योजनेअंतर्गत सर्व कार्यक्रमांच्या टप्पेनिहाय अंमलबजावणीच्या आवश्यक त्या सर्व नोंदी ठेवून कार्यक्रम अंमलबजावणीच्या प्रत्येक टप्प्यानंतर तसेच दरमहा संबंधित जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी संबंधित प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन यांचेकडे योजनेचा प्रगती अहवाल सादर करावा. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन यांनी त्यांचे विभागाचा सदर योजनेचा अहवाल संकलित करून दरमहा १० तारखेपर्यंत आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य पुणे यांना सादर करावा.

योजना सुरु केल्यापासून आणि वरील सर्व कार्यक्रम नियोजनबद्ध पद्धतीने राबविल्यानंतर म्हणजेच सहा महिन्यांच्या टप्प्याने एकुण एक वर्षाच्या कालावधीनंतर योजना पूर्ण झाल्यानंतर सर्व दुधाळ जनावरांचे दुध उत्पादनाबाबत पुन्हा सर्वेक्षण करण्यात यावे व त्याच्या स्वयंस्पष्ट नोंदी कराव्यात. अशा रीतीने योजना राबविल्यानंतर सदर दत्तक गावामध्ये दैनंदिन दुध उत्पादनामध्ये किती वाढ झाली याची नोंद करावी.